10 FEB 2019

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ज्ञानाबरोबरच मैत्री समृद्ध करणे गरजेचे

## – कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे



कागल : डी. आर. माने महाविद्यालयात बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. व्यासपीठावर इतर मान्यवर.

**कागल / प्रतिनिधी :**

जीवनामध्ये स्पर्धा करायची असेल तर ती बलाढ्य स्पर्धकाशी केली पाहिजे. ही स्पर्धा जिंकण्याची मानसिकता निर्माण करा, तरच आयुष्यात मोठा बदल घडेल. स्पर्धेच्या जगात टिकण्यासाठी शिक्षणाशिवाय दुसरे साधन नाही. म्हणूनच विद्यार्थ्यांनी ज्ञानाबरोबरच मैत्रीही समृद्ध करावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

येथील डी. आर. माने महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण व नूतन प्रयोगशाळेच्या उद्घाटनप्रसंगी आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी डॉ. डी. आर. मोरे, गृह विभागाचे पोलीस उपअधीक्षक सतीश माने, संस्थेचे उपाध्यक्ष सुनील माने, संचालक बिपीन माने यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य व संस्थेचे सचिव भैया माने होते. कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विविध क्षेत्रांमध्ये प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला. राष्ट्रपती पदक मिळाल्याबद्दल सतीश माने यांचा, शहर स्वच्छता अभियानामध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल कागल नगरपालिकेचे आरोग्य सभापती प्रवीण काळबर व आरोग्य निरीक्षक नितीन कांबळे यांचा व उपस्थित मान्यवरांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

डॉ. शिंदे म्हणाले, घर, मंदिर आणि शाळा ही संस्काराची केंद्रे आहेत. ग्रामीण भागामध्ये श्रमसंस्कार उपयुक्त ठरतात. जीवनामध्ये आदर्श निर्माण होण्यासाठी आधुनिक, तंत्रज्ञानाबरोबर कौशल्यपूर्ण शिक्षण मिळणे आवश्यक असते. जीवनातील यशाला मित्रही कारणीभूत ठरत असतात. केवळ माणूस कसा आहे हे फक्त मित्रालाच समजत असते. म्हणून विद्यार्थ्यांनी ज्ञानाबरोबरच मैत्रीही समृद्ध करावी, असे आवाहन त्यांनी केले.

भैया माने म्हणाले, प्रतिकूल परिस्थितीमध्ये वाय. डी. माने यांनी या महाविद्यालयाची स्थापना कशी केली हे स्पष्ट करत आज या संस्थेत विविध व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू केले आहेत. तसेच सामाजिक बांधिलकी जपत या महाविद्यालयातील ३ हजार विद्यार्थ्यांनी नगरपालिकेच्या शहर स्वच्छता अभियानामध्ये भाग घेऊन शहर स्वच्छ केले.

यावेळी सतीश माने यांनी शाहू हायस्कूलच्या शिक्षकांमुळे आपण घडल्याचे सांगून त्यांचे ऋण व्यक्त केले. स्वागत प्रा. श्रीनिवास पाटील यांनी केले. प्रास्ताविक प्राचार्य प्रवीण चौगुले यांनी, तर आभार प्रा. बी. आर. पाटील यांनी मानले. कार्यक्रमास उपनगराध्यक्ष नूतन गाडेकर, नितीन कांबळे, बी. जी. कुलकर्णी, अलका मर्दाने, आशा माने उपस्थित होते.